# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांक:24.06.2025** **वार:मंगळवार**

1. इराण आणि इस्त्राईलची युद्धबंदीसाठी सहमती झाल्याचा अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांचा दावा; इराणनं मात्र युद्धबंदीच्या सहमतीचा दावा फेटाळला
2. महात्मा गांधी आणि श्रीनारायण गुरू यांच्यातील ऐतिहासिक संवादाच्या शताब्दी समारंभाचं आज पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते उद्घाटन
3. प्रशासकीय सुधारणांना चालना देण्यामध्ये अंदाज समित्यांची भूमिका महत्त्वाची असल्याचं लोकसभेचे सभापती ओम बिर्ला यांचं प्रतिपादन, आणि
4. अँडरसन-तेंडुलकर चषकाच्या पहिल्या कसोटी क्रिकेट सामन्यात भारताचं इंग्लंडसमोर विजयासाठी 371 धावांचं उद्दिष्ट

**<u>ट्रम्प–इराण-इस्रायल युद्धबंदी</u>**

इराण आणि इस्रायलनं संपूर्ण युद्धबंदीबाबत सहमती दर्शविली असून, येत्या काही तासांत ती लागू होईल, अशी घोषणा अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी काल रात्री केली. कतारमधील अमेरिकेच्या हवाई तळावर इराणी क्षेपणास्त्र हल्ल्यानंतर काही वेळातच ही घोषणा करण्यात आली. युद्धबंदी टप्प्याटप्प्याने लागू केली जाईल. इराण युद्धबंदी सुरू करेल, त्यानंतर इस्रायल 12 व्या तासाला युद्धबंदी करेल आणि त्यानंतर 12 दिवसांच्या युद्धाची अधिकृत समाप्ती होईल, असं ट्रम्प यांनी निवेदनात म्हटलं आहे. दरम्यान, इराणचे परराष्ट्र मंत्री अब्बास अराघची यांनी इस्राईलसोबत युद्धबंदीबाबत कोणताही करार झाल्याचे नाकारलं आहे. इस्रायलनं हल्ले थांबवले, तर इराणही हल्ले थांबवेल, असं अराघची यांनी समाज माध्यमावरील संदेशात म्हटलं आहे. दरम्यान, इराणच्या फार्स न्यूज एजन्सीनं, ट्रम्प यांनी प्रस्तावित केलेली युद्धबंदी योजना पूर्णपणे खोटी आहे आणि ती जनतेचे लक्ष विचलित करण्यासाठी होती. इराणला युद्धबंदीसाठी कोणताही अधिकृत किंवा अनधिकृत प्रस्ताव मिळालेला नाही, असं म्हटलं आहे.

**<u>इराण हल्ला</u>**

दरम्यान, काल इराणनं कतारमधील अल उदेद हवाई तळावर क्षेपणास्त्र हल्ला केला. हा अमेरिकेचा पश्चिम आशियातील सर्वांत मोठा लष्करी तळ आहे. इराकमधील ऐन अल-असद तळावरदेखील इराणनं हल्ला केल्याचं वृत्त आहे. कतारमधील अमेरिकेचा हवाईतळ सावधगिरीचा उपाय म्हणून आधीच रिकामा करण्यात आला होता आणि त्यांच्या हवाई संरक्षण प्रणालींनी येणाऱ्या क्षेपणास्त्रांना यशस्वीरित्या रोखल्यानं या हल्ल्यात कोणतीही जीवितहानी झाली नाही, असं कतार आणि अमेरिकेच्या अधिकाऱ्यांनी म्हटलं आहे. या संकटामुळे विमान वाहतुकीवर परिणाम झाला असून, एअर इंडियाने पश्चिम आशियातील सर्व उड्डाणे तत्काळ स्थगित करण्याची घोषणा केली आहे. वाढत्या तणावाच्या पार्श्वभूमीवर, कतारमधील भारतीय दूतावासाने सावधगिरीच्या सूचना जारी केल्या असून, भारतीयांना घरात राहण्याचा आणि कतारच्या अधिकाऱ्यांकडून येणाऱ्या सूचनांचे पालन करण्याचा सल्ला दिला आहे.

**<u>तेल-किंमती</u>**

कतारमधील अल उदेद अमेरिकन हवाई तळावर इराणनं केलेल्या हल्ल्यानंतर जागतिक पातळीवर तेलाच्या किमतींमध्ये पाच वर्षांतील सर्वांत मोठी एका दिवसातील घसरण नोंदवली गेली. तेलाच्या किमती प्रति बॅरल पाच डॉलर्सने घसरल्या. ऊर्जा

पायाभूत सुविधांना थेट धोका नसल्यामुळे तेल पुरवठा खंडित होण्याची शक्यता कमी असल्याची खात्री पटल्यानं व्यापाऱ्यांनी आठवड्याच्या शेवटी तेलाची विक्री केल्यानं किमतीत मोठी घसरण झाली.

**पंतप्रधान**

महात्मा गांधी आणि महान आध्यात्मिक नेते श्री नारायण गुरू यांच्यातील ऐतिहासिक संवादाच्या घटनेला यंदा शंभर वर्ष पूर्ण होत आहेत. या ऐतिहासिक संवादाच्या शताब्दी समारंभाचं उद्घाटन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते आज नवी दिल्लीत होणार आहे. 12 मार्च 1925 रोजी शिवगिरी मठात महात्मा गांधी आणि श्री नारायण गुरू यांच्यात ही ऐतिहासिक चर्चा झाली होती. सत्याग्रह, धर्मांतर, अहिंसा, अस्पृश्यता निर्मूलन, दलितांचं उत्थान अशा विविध विषयांवर या दोन्ही नेत्यांमध्ये चर्चा झाली होती. भारताच्या मूल्याधिष्ठित समाज रचनेला आकार देणाऱ्या दूरदर्शी संवादाचं स्मरण करण्यासाठी आणि त्यावर चिंतन करण्यासाठी अनेक आध्यात्मिक नेते आणि इतर प्रतिनिधी या समारंभात सहभागी होणार आहेत.

**मोदी**

तीन मूर्ती भवनामध्ये पंतप्रधान संग्रहालय आणि ग्रंथालय सोसायटीची 47 वी वार्षिक सर्वसाधारण सभा काल नवी दिल्ली इथं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. या बैठकीमध्ये पंतप्रधानांनी जगभरात संग्रहालयांचं असलेलं महत्त्व अधोरेखित केलं. अशी संग्रहालयं नव्या पिढ्यांना इतिहासाचा अनुभव देण्यासाठी सहाय्यभूत ठरतात. त्यामुळे समाजात संग्रहालयांचं महत्त्व वाढवण्यासाठी आणि त्यांच्या प्रतिष्ठेसाठी सतत प्रयत्न करण्याची आवश्यकता असल्याचं प्रतिपादन मोदी यांनी यावेळी केलं.

**अजित डोवाल**

राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार अजित डोवाल सध्या चीनच्या दौऱ्यावर असून काल त्यांनी बीजिंगमध्ये चिनचे परराष्ट्र व्यवहारमंत्री वांग यी यांची भेट घेतली. आशियायी प्रदेशामध्ये शांतता आणि स्थैर्य राखण्यासाठी आणि सर्व प्रकारच्या दहशतवादाचा एकत्रितपणे सामना करण्याची आवश्यकता असल्याचं त्यांनी अधोरेखित केलं. या बैठकीदरम्यान दोन्ही नेत्यांनी भारत-चीन द्विपक्षीय संबंधांमधील अलीकडच्या घटनांचा आढावा घेतला आणि भारत-चीन द्विपक्षीय संबंध आणखी विकसित करण्यासाठी उभय देशातील जनतेचे परस्पर संबंध मजबूत करण्यावर भर दिला. 24 व्या विशेष प्रतिनिधी चर्चासत्रासाठी वांग यी यांची भारतात भेट घेण्यासाठी उत्सुक असल्याचं डोवाल यांनी सांगितलं. अजित डोवाल शांघाय सहकार्य संघटनेच्या सुरक्षा परिषद सचिवांच्या 20 व्या बैठकीसाठी चीनच्या दौऱ्यावर आहेत.

**ओम बिर्ला**

प्रशासनाची कार्यक्षमता सुधारून प्रशासकीय सुधारणांना चालना देण्यामध्ये अंदाज समित्यांनी महत्त्वाची भूमिका बजावली आहे, असं लोकसभेचे सभापती ओम बिर्ला यांनी म्हटलं आहे. संसदेसह राज्यं आणि केंद्रशासित प्रदेशांच्या अंदाज समित्यांच्या कार्यारंभाला 75 वर्षं पूर्ण होत असल्यानिमित्त आयोजित राष्ट्रीय परिषदेचं उद्घाटन काल मुंबईत ओम बिर्ला यांच्या हस्ते झालं, त्यावेळी ते बोलत होते. यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस उपस्थित होते. लोककल्याणासाठी या समित्यांनी वेळोवेळी शिफारसी केल्याचं बिर्ला यांनी सांगितलं. संसदेच्या अंदाज समितीच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त काढलेल्या विशेष स्मरणिकेचं प्रकाशन यावेळी ओम बिर्ला यांच्या हस्ते करण्यात आलं.

**ॲक्झीओम**

भारतीय अंतराळवीर शुभांशु शुक्ला यांचा समावेश असलेलं ॲक्झीओम-4 या आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानकाचं प्रक्षेपण उद्या होण्याची शक्यता आहे. नासाच्या अधिकृत संकेतस्थळांवरील माहितीनुसार, नासा, ॲक्झीओम स्पेस आणि स्पेसएक्स त्यांच्या या चौथ्या खासगी अंतराळवीर मिशनसाठी आंतरराष्ट्रीय प्रमाणवेळेनुसार, उद्या दुपारी 12 वाजून 01 मिनिटानं प्रक्षेपण करण्यात येणार आहे. या मोहिमेची सुरुवात फ्लोरिडामधील नासाच्या केनेडी स्पेस सेंटरच्या लॉन्च कॉम्प्लेक्स 39A वर होणार आहे. या

मोहिमेला 29 मे रोजी सुरुवात होणार होती. पण अनेक अडथळयांमुळे मोहीम स्थगित झाली. पहिल्यांदा 8 जून, नंतर 10 जून आणि 11 जूनलाही हा प्रक्षेपण कार्यक्रम स्थगित करण्यात आला.

**त्रिपुरा**

त्रिपुरा हे देशातलं तिसरं पूर्ण साक्षर राज्य बनलं आहे. आगरताळा इथं झालेल्या एका कार्यक्रमात त्रिपुराचे मुख्यमंत्री डॉ. माणिक साहा यांनी हे जाहीर केलं. त्रिपुराच्या इतिहासात हा दिवस सुवर्णाक्षरांनी लिहिला जाईल अशी प्रतिक्रिया त्यांनी व्यक्त केली. कोणत्याही वयात शिक्षण घेता येते त्यासाठी ठरावीक वय वा वेळेची गरज नसते असं ते म्हणाले.

**गडकरी-स्टार्ट-अप**

देशाचं भवितव्य कालानुरुप विकसित होणाऱ्या तंत्रज्ञानावर आधारित असल्यानं स्टार्ट-अप हे त्याचे प्रमुख माध्यम आहे, असं प्रतिपादन केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी काल पुण्यात केलं. स्टार्टअप परिषदेच्या पारितोषिक वितरण समारंभात ते बोलत होते. यावेळी विविध क्षेत्रातील नावीन्यपूर्ण स्टार्टअपना पुरस्कार देण्यात आले. यापुढील काळात गरजांवर आधारित संशोधन होण्याची गरज असून टाकाऊ पदार्थातून संपत्ती निर्माण करण्यावर भर दिला पाहिजे, असं आवाहनही गडकरी यांनी यावेळी केलं.

**क्रिकेट**

भारत आणि इंग्लंड यांच्यातल्या अँडरसन - तेंडुलकर चषकाच्या हेडिंग्ले इथं सुरू असलेल्या पहिल्या कसोटी क्रिकेटमध्ये भारतानं इंग्लंडसमोर जिंकण्यासाठी पहिल्या डावातील नाममात्र सहा धावांच्या आघाडीसह 371 धावांचं उद्दिष्ट ठेवलं आहे. दुसऱ्या डावात भारताने 364 धावा केल्या असून उपकर्णधार ऋषभ पंतने 116 धावा फटकावल्या. दोन्ही डावात शतक ठोकणारा तो पहिला भारतीय ठरला आहे. के एल राहुलनेदेखील संयमी 137 धावा केल्या. तर शेवटचे तीन फलंदाज शून्यावर बाद झाले. काल दिवसअखेर इंग्लंडने बिन बाद 21 धावा केल्या आहेत. सामन्याचा आज अखेरचा दिवस आहे. दुसरी कसोटी दोन जुलैपासून बर्मिंगहॅम इथं सुरू होणार आहे.

# याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं, नमस्कार.